# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 15/03/2020 (रविवार)
# (सकाळ)

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर आसोली शिवार सुरज ढाबा येथे दिनांक 13/03/2020 चे 02.00 वा. ते 02.15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अमरसिंग भद्दुजी मेहुले, वय 39 वर्ष, रा. आसोली यांनी त्यांची एमएच– 40/यु– 7978 क्रमांकाची पॅशन प्रो मोटरसायकल पानठेल्याचे बाजुला उभी ठेवुन पानठेल्यावर हजर असतांना तेथे काही ट्रक वाले लोक आले. तसेच त्या ट्रक मधुन मोबाईल चोरी केल्याचे ओरडत असल्याने फिर्यादी हे पानटेल्यावरून ट्रक कडे पाहण्यास गेले असता अज्ञात आरोपीने फिर्यादींची मोटरसायकल किं. 10,000/–रू. ची व ट्रक मधील इसमाचा 1 सॅमसंग कंपनीचा मोबाईल किं. 3,000/– रू. असा एकुण 13,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक देवेन्द्र भुरे 8888864967 हे करीत आहे.

## दुखापत

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर वार्ड क्र. 1 खापरखेडा येथे दि. 14/03/2020 चे 08.00 वा. ते 08.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. रजनी रामुजी बसुले, वय 45 वर्ष, रा. वार्ड नं. 03 खापरखेडा या त्यांच्या जनरल स्टोअर दुकानात हजर होत्या. दरम्यान आरापी नामे– आशिष सुरेश भड, वय 30 वर्ष, रा. वार्ड क्र. 2, खापरखेडा हा फिर्यादीच्या दुकानात घुसुन लाकडी दंडयाने दुकानातील काचेची आलमारी, काचेचे गेट दंडयाने फोडत असल्याने फिर्यादीने अडविले असता आरोपीने फिर्यादीच्या उजव्या हाताचे कोनीजवळ मारले. तसेच दुकानाबाहेर उभी असलेली ॲक्टीवा गाडी क्र एमएच– 40/एजे– 2452 गाडीचे काचाला तोडुन नुकसान करून फिर्यादीचे मुलाला जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 452, 324, 504, 506, 427 भादवी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सुरेन्द्र ठाकरे 9011012027 हे करीत आहेत.

2) पो.स्टे. उमरेड :– दि. 14/03/2020 चे 14.00 वा. ते 14.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– चेतन रावलसन राठोड, वय 30 वर्ष, रा प्लॉट नं 88, अलंकार नगर हे सौ. संगिता मेश्राम मानेवाडा नागपुर यांचे घरी किरायाने हे डी पी जैन कंस्ट्रक्शन अंतर्गत मौजा हेटी शिवारात राष्ट्रीय राज्य महामार्गाचे चौपदरीकरण साइड मॅनेजर म्हणुन काम पाहत असतांना वाहन क्र एमएच–31/3775 (407) मध्ये 3 अनोळखी आरोपी आले आणि साइड रोडचे बाजुला असलेले झाडे कटर मशिनने कापत होते. दरम्यान फिर्यादीने हे फॉरेस्टची झाडे कापु नका असे म्हटले असता तीन्ही आरोपीतांनी संगनमत करून, फिर्यादीला लाकडी काठीने डोक्यावर डाव्या खांदयावर मारहाण करून जखमी केले. तसेच सहकारी लेबर मध्यस्थी करण्यात आले असता त्यांना सुद्धा हातबुक्कीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 34 भादवी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ठाकुर 9423600556 हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर